# गिरगावच्या मेट्रो रेल्वे विस्थापितांसाठी बांधणार काळबादेवीला ४८ मजली इमारत

■ मुंबई

**मुंबईतील** कुलाबा- बांद्रा- सिपज या भुयारी मेट्रो रेल्वेमुळे विस्थापित होणाऱ्या शेकडो गिरगावकर रहिवाशांसाठी काळबादेवी येथे ४८ मजली गगनचुंबी इमारत बांधण्यात येणार आहे. त्यात गिरगावच्या विस्थापितांना घरे, दुकाने आणि कार्यालये मिळणार आहेत.

मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन जाहीर केले आहे की, विस्थापितांना सामावून घेण्यासाठी इमारत बांधण्याच्या योजनेला बांधकाम क्षेत्रातील विविध कंपन्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. या ४८ मजली इमारतीमध्ये भुयारी मेट्रो रेल्वे मार्गासाठी गिरगाव काळबादेवी भागातील ज्या इमारती पाडाव्या लागल्या आणि जे रहिवासी विस्थापित झाले आहेत, त्यांना या इमारतीमध्ये सदनिका, दुकाने आणि कार्यालये देण्यात येणार आहेत. आतापर्यंत ही ४८ मजली इमारत बांधण्यासाठी जे.एम.सी. प्रोजेक्ट इंडिया, टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेड, व्हास्कॉन इंजीनियर्स, शापूरजी पालनजी, मोंटो कार्लो, कॅपॅसिट इन्फ्रा प्रोजेक्ट, न्याती इंजिनिअर्स अँड कन्सल्टंट, मेन कन्स्ट्रक्शन आणि नाथांनी पारीख कन्स्ट्रक्शन या कंपन्यांनी पात्रता पूर्व फेरीसाठी निविदा पाठविल्या आहेत.